# ठाणे महानगरपालिका, ठाणे

स्वच्छ ठाणे । सुंदर ठाणे

# ठाणे महानगरपालिका क्षेत्रात लावण्यात येणारे कापडी फलक, बॅनर, होर्डींग व पोस्टर इ. यांचे नियंत्रणबाबतची कार्यपध्दती व मार्गदर्शक सूचना

## अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग

(फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता)

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात लावण्यात येणारे कापडी फलक, बॅनर, होर्डींग व पोस्टर इ. यांचे नियंत्रणा बाबतची कार्यपद्धती व मार्गदर्शक सूचना

# जाहिरात विभाग
# ठाणे महानगरपालिका, ठाणे

क्र.ठामपा/अति.वि/आयुक्त/ १४२८/२०१५
दि. ०३/ १० /२०१५

**भाग -१ प्रस्तावना :-**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात शहरातील नागरिक, खाजगी संस्था, राजकीय पक्ष व इतर विविध प्रकारे शहरातील सार्वजनिक जागा, रस्ते, फुटपाथ, बगिचे, मोकळे मैदान, चौक, शासकीय इमारती इत्यादी ठिकाणी अनधिकृतपणे कापडी फलक, पोस्टर, बॅनर्स इ. लावून शहराचे मोठया प्रमाणात विद्रुपीकरण करण्यात येत आहे. सदर बाबींमुळे शहराच्या सौंदर्यास बाधा निर्माण होत असून अनेकवेळा वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. या सर्व बाबींवर नियंत्रण आणण्याचे व शहराचे विद्रुपीकरण होऊ नये याकरिता उपाययोजना करण्याची बाब विचाराधीन होती. तसेच मा.उच्च न्यायालय व महाराष्ट्र शासन यांचेकडूनही याबाबतीत धोरण निश्चित करणेसंदर्भात सूचना प्राप्त झालेल्या आहेत. या सर्व बाबींचा विचार करुन शहरातील विद्रुपीकरणास आळा घालणेकरिता ठाणे महानगरपालिका क्षेत्रात लावण्यात येणारे कापडी फलक, बॅनर, होर्डींग व पोस्टर इ. यांचे नियंत्रणाबाबतची कार्यपद्धती व मार्गदर्शक सूचना निश्चित करण्यात येत आहे.

## भाग -२ कायदेशीर तरतुदी :-

महाराष्ट्र प्रिवेंशन ऑफ डिफेसमेंट ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट, १९९५ चे कलम ५ अन्वये सार्वजनिक ठिकाणांचे जनतेच्या दृष्टीकोनातून कोणत्याही विद्रुपीकरणापासून मोकळीक करणे तसेच कोणत्याही प्रकारचे लिखाण पुसून टाकणे, उभारलेल्या किंवा चिटकविलेल्या बाबी काढून टाकणे याकरिता कार्यवाही करणे व कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे यासाठी शासन परिपत्रक क्र.एमआयएस २०१४/प्र.क्र.१२०३/पोल-११ दि.१-९-२०१४ नुसार राज्यातील आयुक्त, महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र.१५५/२०११ तसेच इतर जनहित याचिका, रिट पिटीशनचे अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने पारित केलेले आदेश. त्याचप्रमाणे रिट पिटीशन नं.५४६/२००६ औरंगाबाद खंडपीठाचे आदेश.

याबाबींचा विचार करुन महानगरपालिका हद्दीत लावण्यात येणारे कापडी फलक, पोस्टर्स, बॅनर्स इ. संदर्भातील कायदेशीर बाबी खालील प्रमाणे :-

(अ) **महाराष्ट्र सार्वजनिक मालमत्ता विरुपण अधिनियम, १९९५ मधील तरतुदी.**

(ब) **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २४४ व २४५ अन्वये महानगरपालिका क्षेत्रातील जाहिरात व फलक यांच्या नियंत्रणासंबंधी शासन अधिसूचना क्र.जीईएन १०९७/१६/प्र.क्र.३८/९७/नवि-२७ दि.१-७-२००३ अन्वये नियम तयार केलेले असून सदर नियमातील तरतुदी.**

(क) **मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र.१५५/२०११ चे अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने पारित केलेले आदेश / सूचना.**

(ड) **मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.१५५/२०११ चे अनुषंगाने दिलेले महत्त्वाचे आदेश व सूचना.**

१. प्रभाग अधिकारी/सहाय्यक आयुक्त यांची महाराष्ट्र महानगरपालिका **अधिनियमाचे** कलम २४४, २४५ ची अमंलबजावणी करण्याची जबाबदारी असेल **आणि उपआयुक्त यांच्यावर** पर्यवेक्षणाची जबाबदारी असेल (मा.उच्च न्यायालयाचे दि.०६/०८/२०१४ **चे आदेश). तसेच** वरील महापालिका अधिकाऱ्यांना कारवाईसाठी पोलिस संरक्षण देण्याची **जबाबदारी संबंधित** पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अथवा पोलिस स्टेशनचे प्रमुख यांची असेल.

२. जेव्हा महापालिकेचे अधिकारी डिफेंसमेंट ॲक्टमधील तरतुदीनुसार गुन्हा घडल्याचे **कळवतील** (यामध्ये तोंडी कळविल्याचा समावेश राहिल) तेव्हा संबंधित पोलीस ठाण्याचे प्रभारी **अधिकारी** यांचेवर सदर गुन्ह्याबाबत या कायद्यानुसार जर तो गुन्हा दखलपात्र असेल तर तो गुन्हा नोंद करणे बंधनकारक राहिल (जनहित याचिकेच्या संदर्भात गृह विभागाचे शासन परिपत्रक क्र.एमआयएस-२१४/प्र.क्र.१२०३/पोल-११ दि.१८-०९-२०१४).

३. महापालिका हद्दीत लावण्यात आलेल्या अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, होर्डिंग, कमानींवर कारवाई करताना कारवाईपूर्वी पोस्टर्स, बॅनर्स, होर्डिंग, कमानीचे संबंधित कर्मचारी फोटो घेतील व त्याची प्रत गुन्हा दाखल करताना पोलिसांना तक्रारीसोबत देतील.

४. महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या तक्रारीकडे स्थानिक पोलीस स्टेशनचे अधिकारी दुर्लक्ष करतील अशा ठिकाणी संबंधित महापालिका अधिकारी याबाबत समन्वय पोलीस अधिकाऱ्याकडे लेखी तक्रार करतील. सदर तक्रारीच्या अनुषंगाने समन्वय अधिकारी यांचेद्वारे योग्य त्या उपाययोजना त्वरीत करण्यात येतील.

५. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ठाणे महानगरपालिकेने अनधिकृत कापडी फलक, बॅनर, होर्डीग व पोस्टर इ. संदर्भात नागरिकांना तक्रारी करणेसाठी टोल फ्री क्र.१८००-२२२-१०८ सुरु केलेला आहे. तसेच या संदर्भात SMS द्वारे नागरिकांना तक्रारी करणेकरिता भ्रमणध्वनी क्र.७५०६९४६१५५ सुरु करण्यात आलेला आहे. प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत सहाय्यक आयुक्त यांनी कारवाई करुन तक्रार निवारण केल्याबाबत तक्रारदारास SMS द्वारे कळविण्यात येईल.

६. मा.उच्च न्यायालयाच्या दि.३०/०९/२०१४ रोजीच्या आदेशानुसार महानगरपालिका हद्दीत पोस्टर्स, बॅनर्स, होर्डिंग लावणेबाबत परवानगी देण्यात आलेल्या पोस्टर्स, बॅनर्स, होर्डींगच्या दर्शनी भागावर परवानगीचा संदर्भ क्रमांक व कालावधी आणि समाप्ती दिनांक स्पष्ट/ठळकपणे

प्रदर्शित करणे बंधनकारक राहिल. असे न केल्यास ज्या पोस्टर्स, बॅनर्स, होर्डिंगवर अशा प्रकारची माहिती प्रदर्शित करण्यात आलेली नसेल असे पोस्टर्स, बॅनर्स, होर्डीग अनधिकृत समजून ते काढून टाकण्यात येतील. मुद्रक व प्रकाशक यांचे नाव, पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक जाहिरातीच्या दर्शनी भागावर चौकटीत दर्शवणे बंधनकारक राहिल.

७. महापालिका हद्दीत लावण्यात आलेल्या अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, होर्डीग संदर्भात नागरिकांमध्ये विशेष जनजागृती होण्याच्या उद्देशाने प्रतिष्ठित नागरीक उदा.नगरसेवक, वकील, अभियंता, डॉक्टर, पत्रकार व स्वयंसेवी संस्था यांची मा.उच्च न्यायालयाच्या दि.२४/११/२०१४ रोजीच्या आदेशानुसार महानगरपालिका हद्दीत प्रभाग समिती निहाय नागरिकांची समिती (Citizen Committee) स्थापन करण्यात आलेली आहे. सदर समिती कार्यरत व सक्रीय ठेवण्यात यावी.

## भाग -३ कार्यपध्द्ती :-

## परवानगीचे अधिकार :-

१. तात्पुरत्या स्वरुपाचे कापडी फलक/बॅनर/पोस्टर लावणे/उभारणेची परवानगी देण्याचे अधिकार संबधित प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त यांचे असतील.

२. फलक/बॅनर/पोस्टर लावणे/उभारणेसाठी परवानगीसाठीचा अर्ज किमान सात दिवस आधी महानगरपालिकेकडे करणे आवश्यक राहिल. परंतु आणीबाणी/अपवादात्मक प्रसंगी अर्जदाराने अर्जामध्ये नमूद केलेले कारण व प्रसंग विचारात घेऊन सदर कालावधी कमी करण्याचे अधिकार सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांना राहतील. अर्जामध्ये लावण्यात/उभारण्यात येणाऱ्या फलक/बॅनर/पोस्टरची संख्या, मोजमाप, जागेचा अचूक तपशील नमूद करणे आवश्यक राहील.

३. अर्जासोबत प्रदर्शित करावयाचे फलक/बॅनर/पोस्टरचे संकल्पचित्र मजकूरासह देणे आवश्यक राहिल.

४. समाजात तेढ निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. कोणताही आक्षेपार्ह मजकूर बॅनरवर छापू नये.

५. ठाणे महापालिकेने जाहिरातदारांना ज्या ठिकाणी जाहिराती प्रदर्शनाची परवानगी दिलेली आहे व निविदेद्वारा ज्या ठिकाणी जाहिरात प्रदर्शित करण्याचे हक्क दिलेले आहेत अशा ठिकाणीही जाहिरात प्रसिध्द करताना कोणताही आक्षेपार्ह मजकुर छापला जाणार नाही याची संबंधित जाहिरातदार यांनी दक्षता घ्यावी. अशा प्रकारचे मजकुर छापणेपुर्वी त्या मजकुरास उपआयुक्त, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग यांची पुर्वमान्यता घेण्यात यावी. एखाद्या जाहिरातीमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास संबंधित जाहिरात अभिकरणाची फलक उभारण्यास दिलेली परवानगी रद्द करण्यात येईल.

६. निश्चित केलेल्या जागांवर परवानगी देताना मागणीच्या प्राध्यान्यक्रमाने मंजुरी देण्यात येईल. सदर मागणी अर्ज जास्तीत जास्त ३० दिवस अगोदर करता येतील. त्या अगोदर केलेले मागणी अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

७. प्रभाग समितीकडून देण्यात आलेल्या सर्व परवानग्या महापालिकेच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात येईल. तसेच त्याची प्रत संबंधित पोलीस स्टेशनला सुध्दा देण्यात यावी.

८. फलकाची कमाल मुदत :- ०३ (तीन) दिवस इतकी राहिल.

फक्त उत्सव काळात फलकाची कमाल मुदत :- १० (दहा) दिवस इतकी राहिल.

मुदत संपल्यानंतर सदर फलक/बॅनर/पोस्टर काढण्याची जबाबदारी संबधितांची राहील.

९. **परवानगीसाठी अनुज्ञेय असलेली ठिकाणे :-**

कापडी फलक/बॅनर/पोस्टर लावणे/उभारणेसाठी सार्वजनिक जागांमध्ये उद्याने, मैदान, सार्वजनिक शौचालय, बस थांबे, महानगरपालिकेने निश्चित केलेल्या महानगरपालिका इमारतीच्या जागा व भविष्यात महानगरपालिकेकडून काही आणखी सार्वजनिक ठिकाणी निश्चित केलेल्या जागा, खाजगी मालकाचे ना हरकत पत्रान्वये उपलब्ध असलेल्या खाजगी जागा, इतर शासकीय संस्था यांचे ना हरकत दाखला अन्वये उपलब्ध असलेल्या शासकीय मालकीच्या जागा, महानगरपालिकेच्या विविध जाहिरात माध्यमांद्वारे निश्चित केलेल्या संबंधित अधिकृत जाहिरात एजन्सीचे परवानगीने उपलब्ध असलेल्या जागा या ठिकाणी परवानगी अनुज्ञेय राहिल.

१०. **परवानगीसाठी अनुज्ञेय नसलेली ठिकाणे :-**

त्याचप्रमाणे अनुज्ञेय नसलेली ठिकाणी पुढील प्रमाणे असतील. विजेचे खांब, हायमास्ट, फुटपाथ, चौक, रस्ता दुभाजक, वाहतूक बेटे, दुरध्वनी पोल, विद्युत डीपी, ट्रान्सफॉर्मर, सिग्नलचे खांब, दिशादर्शक फलक येथे परवानगी अनुज्ञेय असणार नाही.

त्याचप्रमाणे खाजगी जागेवर परवानगी देणेची असल्यास संबंधित जागा मालकाचे ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहिल. तसेच इतर शासकीय/निमशासकीय कार्यालयाची जागा असल्यास संबंधित शासकीय कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहिल.

११. विनापरवानगी लावलेले फलक/बॅनर/पोस्टर व मुदत संपलेले फलक/बॅनर/पोस्टर काढून टाकणेची कारवाई प्रभाग स्तरावर करण्यात यावी व अशा सर्व प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात यावा. जर एखादया संस्था किंवा व्यक्ती यांच्यावर तीन वेळा अशा स्वरुपाचा गुन्हा दाखल झाला तर अशा संस्था किंवा व्यक्तीविरुध्द् सीआरपीसी कलम ११० अंतर्गत चांगल्या वर्तणुकीसाठी हमीपत्र (Bond for Good Behaviour) घेण्यासाठी संबंधित सहाय्यक पोलीस आयुक्त यांना कळविण्यात यावे. त्याचप्रमाणे संबंधितास भविष्यात सरसकट परवानगी देण्यास मनाई करण्यात यावी व संबंधित

संस्था/व्यक्ती यांची नावे काळया यादीत टाकून त्याला महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी.

१२. परवानगी प्रमाणे फलक लावतेवेळी फलकावर परवानगी देण्यात आलेल्या एकुण फलकांची संख्या व लावण्यात आलेल्या फलकांची संख्या दर्शविण्यात यावी. उदा.१/१०, २/१०, ३/१० याप्रमाणे.

१३. मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार अनधिकृत पोस्टर्स/बॅनर्स हटविणे, अनधिकृत कमानी हटविणेकरीता सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकाऱ्यांची "नोडल ऑफीसर" म्हणून कार्यालयीन आदेश क्र.ठामपा/अति.वि/आयुक्त/२०६३ दि.३-१२-२०१४ नुसार नियूक्ती करण्यात आली आहे. सदर आदेशानुसार प्रभाग समिती कार्यक्षेत्रात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २४४ व २४५ नुसार कारवाई कार्यक्षमतेने करण्याची जबाबदारी संबंधित सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकाऱ्यांची राहिल.

१४. जनहित याचिका क्र.१५५/२०११ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, फ्लेक्सेस इ. काढण्याची कार्यवाही करणेसाठी ठाणे पोलीस आयुक्तालयातील पोलीस उपायुक्त दर्जाचे अधिकाऱ्यांची "नोडल ऑफीसर" म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकाऱ्यांनी आवश्यकते वेळी पोलीस विभागाकडील संबंधित नोडल ऑफिसर यांचेशी समन्वय ठेऊन कारवाई करण्यात येईल.

१५. दिलेली परवानगी कोणत्याही कारणास्तव रद्द करण्याचे अधिकार सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांना राहतील.

१६. परवानगी देण्याचे व कारवाई करण्याचे अधिकार सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांना असले तरी त्यांचे अधिनस्त कार्यालयीन अधिक्षक/उपकार्यालयीन अधिक्षक/उपअभियंता/ सहाय्यक पदनिर्देशित अधिकारी/लिपिक, अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग यांनी सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांचे आदेश/सूचनेनुसार काटेकोरपणे अंमलबजावणीबाबत कारवाई करावयाची आहे.

१७. पोस्टर/बॅनर्स लावणाऱ्या अर्जदारांचे संपूर्ण ओळख जसे निवासी पत्ता, पॅनकार्ड, आधारकार्ड, बँकेचे फोटो असलेले पासबुक व भ्रमणध्वनी क्रमांक घेण्यात यावे. तसेच पोस्टर्स, बॅनर्स, होर्डिंगखाली प्रकाशकाचे नाव, पत्ता असणे आवश्यक आहे.

१८. **महापालिकेच्या रस्त्यावर व फुटपाथवर कोणत्याही प्रकारचे तात्पुरते प्रवेशद्वार व कमानी लावण्यास परवानगी देण्यात येऊ नये (मा.उच्च न्यायालयाचे आदेश).**

१९. सदरच्या मार्गदर्शक सुचना हया महापालिकेकडून यापूर्वी वेगवेगळया जाहिरात माध्यमांना देण्यात आलेल्या परवानगीनुसार लावण्यात आलेल्या जाहिरातीचे माध्यमास लागू राहणार नाही.

२०. महानगरपालिकेकडून एखादा कार्यक्रम किंवा महोत्सव साजरा करण्यात येत असेल त्यावेळी सदर कार्यक्रम/महोत्सवासाठी लावण्यात येणारे पोस्टर्स, बॅनर्स, होर्डिंगसाठी परवानगीची आवश्यकता असणार नाही.

२१. शासनाच्या विविध कार्यक्रमाच्या, योजना जनहितार्थ/प्रबोधनार्थ करण्यात येणारी जाहिरात तसेच कोणतीही सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना यांचेमार्फत समाजपयोगी कार्यक्रमाकरीता करण्यात येणारी जाहिरात याकरीता जाहिरात शुल्कात सवलत/माफ करण्याचे अधिकार महापालिका आयुक्त अथवा महापालिका आयुक्त ज्या अधिकाऱ्याला सदरचे अधिकार प्रदान करतील तो अतिरिक्त आयुक्त यांच्या पेक्षा कमी दर्जाचा नसेल यांचे राहतील.

२२. सदरची कार्यपध्दती व मार्गदर्शक सुचनांची अंमलबजावणी या आदेशाच्या तारखेपासुन अंमलात येईल.

## भाग - ४ अटी व शर्ती :-

१. खाजगी जागेत कापडी फलक/बॅनर/पोस्टर लावणे/उभारणेची परवानगी देताना संबंधित जागा/ स्ट्रक्चर मालकाचा ना हरकत पत्र सादर करणे आवश्यक राहिल.

२. तात्पुरते उभारण्यात येणारे फलक हे बांबुच्या सहाय्याने उभारलेले असावेत. सदर जाहिरात फलक उभारताना इलेक्ट्रीक पोल, कमान, दिशादर्शक फलक, इतर नाम फलक रस्ता/फुटपाथ, वाहतुक बेट, चौक, सिग्नल इत्यादी भागावर कापडी फलक येणार नाही. तसेच वाहतुकीस व रहदारीस अडथळा होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. असे केल्यास संबंधितांकडून नियमानुसार दंडात्मक कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

३. परवानगी देण्यात आलेले जाहिरात फलकाची उंची लावण्यात येणाऱ्या ठिकाणाच्या भौगोलिक परिस्थितीनुसार असावी. शक्यतो ३ मीटरपेक्षा कमी उंचीवर असणार नाही व रहदारीस किंवा वाहतुकीस अडथळा येणार नाही तसेच सदर जाहिरात फलकापासून कोणासही इजा, अपघात होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी परवानगी घेणाऱ्याची राहिल.

४. सदर जाहिरात फलक लावणेसाठी मान्यता दिल्यानंतर निश्चित केलेल्या दरसूचीनुसार जाहिरात फी व अनामत अर्जदाराने महापालिकेकडे भरणे आवश्यक राहिल.

५. पोस्टर व बॅनर लावणे/उभारणेसाठी देण्यात आलेल्या परवानगी कालावधीनंतर ते स्वतःहून काढून घेण्यात येईल असे **हमीपत्र** अर्जदाराने लेखी स्वरुपात देणे बंधनकारक राहील. तसेच सदर हमीपत्रात परवानगी दिलेल्या ठिकाणांचे व संख्येचे व मोजमापाचे पोस्टर, बॅनर लावण्यात येतील याचा तपशील नमूद करणे बंधनकारक राहिल.

परवानगीची मुदत संपल्यानंतरही संबंधितांकडून फलक/बॅनर/पोस्टर स्वतःहून न काढल्यास ते महापालिकेमार्फत हटविण्यात येऊन संबंधितांविरुध्द् गुन्हा दाखल करण्यात यावा. सदर कारवाईसाठी येणारा खर्च संबंधितांकडून वसूल करण्यात येईल व स्वतः काढण्याच्या आकाराची रक्कम जप्त करण्यात येईल.

६. मा.उच्च न्यायालयाने दि.३०-०९-२०१४ रोजीच्या सुनावणीचे आदेशातील बाब क्र.(e) नुसार पोस्टर्स, बॅनर्स, होर्डींगवर परवानगीचा क्रमांक, दिनांक व कालावधी नागरिकांना दिसेल अशा पध्दतीने फलकाच्या दर्शनी भागावर प्रदर्शित करणेबाबत आदेश दिलेले आहेत. त्यानुसार

परवानगीचा क्रमांक, दिनांक व कालावधी फलकावर प्रदर्शित करणे परवानगीधारकावर बंधनकारक राहिल. परवानगीचा क्रमांक, दिनांक व कालावधी प्रदर्शित केला नसेल तर अनधिकृत समजून त्यावर कारवाई करण्यात येईल/गुन्हे दाखल करण्यात येतील.

७. जाहिरात फलकावरील मजकुर वैयक्तिक दोषारोप करणारा तसेच समाजाच्या धार्मिक भावना दुखावणारा नसावा. एखादया बॅनर/फलकावरील मजकुरामुळे तेढ अथवा तणाव निर्माण झाल्यास ते बॅनर्स /फलक तात्काळ काढण्याचे अधिकार संबंधित सहाय्यक आयुक्त यांना राहतील.

८. विनापरवाना लावण्यात येणाऱ्या कापडी फलक, पोस्टर्स, बॅनर्स, होर्डींग तसेच परवानगी घेतलेल्या संख्येपेक्षा व आकारमानापेक्षा जास्त प्रमाणात लावण्यात येणाऱ्या कापडी फलक, पोस्टर्स, बॅनर्स, होर्डींगवर जाहिरात आकार, प्रशासकीय आकार, व कापडी फलक, पोस्टर्स, बॅनर्स, होर्डींग स्वतः काढण्यासाठी आकारावयाच्या रकमेच्या दुप्पट रक्कम दंड म्हणुन आकारण्यात येईल.

९. स्वतः काढण्यासाठी येणाऱ्या खर्चाची भरलेली रक्कम परत देण्यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही पूर्ण करणे आवश्यक आहे. सदर रक्कम परत घेण्यासाठी संबंधितांनी मुदत संपण्यापूर्वी परवानगी अन्वये लावलेला कापडी फलक, पोस्टर्स, बॅनर्स, होर्डींग मूदतीत काढलेले आहेत याचा पुरावा सादर करावा लागेल व तसा पुरावा दिला नाही तर सदरची रक्कम जप्त करण्यात येईल.

१०. लावण्यात येणाऱ्या बॅनरवर सदर बॅनर प्रिंट करणाऱ्या प्रिंटर्सचे नाव, पूर्ण पत्त व भ्रमणध्वनी क्रमांक छापलेले असणे आवश्यक आहे. अटी व शर्तींचे उल्लंघन केल्यास संबंधित प्रिंटर्सचे लायसन्स रद्द करणेबाबत संबंधित शासकीय यंत्रणेला सूचित करण्यात येईल.

११. कापडी फलक, बॅनर, होर्डींग व पोस्टर इ. लावणेची परवानगीकरिता अर्ज करतेवेळी संबंधितांनी लावण्यात येणाऱ्या बॅनर्सचे ठिकाण अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

१२. लावण्यात आलेल्या कापडी फलक, बॅनर, होर्डींग व पोस्टर इ. कुठल्याही प्रकारे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधितांची राहिल.

१३. परवानाधारक यांचेकडून ठाणे महानगरपालिकेने निश्चित केलेल्या कार्यपध्दती व मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल याप्रमाणे तसेच सदर बाबींचे उल्लंघन केल्यास नियमानुसार गुन्हयास पात्र राहिल असे हमीपत्र घेणेत यावे.

१४.कोणताही कापडी फलक, पोस्टर्स, बॅनर्स, होर्डीग झाडावर अथवा झाडाच्या फांदीवर लावण्यात येऊ नये तसेच झाडाला कोणत्याही प्रकारचे खिळे ठोकून लावण्यात येऊ नये. असे निदर्शनास आल्यास परवानगी रद्द समजण्यात येईल व पुढील कायदेशीर कार्यवाही केली जाईल.

१५.पोस्टर्स, बॅनर्स, होर्डिंग लावणेसाठी निवडणूक काळात (आचारसंहिता) कुठल्याही प्रकारची परवानगी देण्यात येणार नाही.

१६.पोस्टर्स, बॅनर्स, होर्डिंगवरील मजकूर समाजात ताण निर्माण करणारा नसावा.

१७.धार्मिक सद्‌भाव राखला जाईल याबाबत काळजी प्रकाशकांनी घ्यावी.

१८.शासनाचे नियम, शासन निर्णय, मार्गदर्शक तत्वे, महानगरपालिकेचे धोरण, नियम, मार्गदर्शक तत्वे तसेच भारतातील न्यायालयीन कक्षा असणाऱ्या सर्व न्यायालयांचे निर्णय, त्यातील Ratio यांचे बंधन प्रकाशकावर राहिल.

**टिपः-** वसूल करण्यात येणारी जाहिरात फी / प्रशासकीय आकार रक्कम व स्वतः काढण्यासाठी लागणाऱ्या खर्चाची रक्कम याबाबतच्या दरांची माहिती सोबत जोडली आहे.

## भाग - ५ सर्वसाधारण :-

१. सदर धोरणानुसार सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी जी काही कार्यवाही करतील ती सद्‌बुध्दीने केलेली आहे असे समजण्यात येईल.

२. सदर कार्यपध्दतीमध्ये कोणतीही पूर्वसूचना न देता आवश्यकतेनुसार फेरफार करण्याचे सर्वाधिकार आयुक्त यांचेकडे एकटवले राहतील.

३. सदर कार्यपध्दतीमध्ये काहीही नमूद असले तरी अधिनियमातील तरतूदी, सर्वोच्च न्यायालय तसेच उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निर्देश/निर्णय, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, परिपत्रके, शासन निर्णय, इतर नियमावली यांचे सापेक्ष राहिल.

**भाग क्र.६ अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, होर्डीग यावर नियंत्रण आणणेसाठी करावयाच्या उपाययोजना :-**

ठाणे महानगरपालिका हद्दीत वारंवारपणे, अनधिकृतपणे पोस्टर्स, बॅनर्स, लावून शहराचे विद्रुपीकरण करण्यात येत असते. महापालिकेकडून नियमितपणे त्यावर कार्यवाही करुन पोस्टर्स, बॅनर्स काढून जप्त केले जातात व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार वेळोवेळी गुन्हे दाखल करण्यात येत असतात.

सदर कार्यवाहीचे वेळी कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे, मनुष्यबळ, यंत्रणा वाहने, पोलीस बंदोबस्त घेणे इत्यादी साठी महानगरपालिकेचा निधी मोठया प्रमाणात खर्च होत आहे. ज्या व्यक्ती/संस्था परवानगी घेऊन जाहिरात कर अदा करुन तीन दिवसांसाठी पोस्टर्स/बॅनर्स लावतात त्यांच्याकडून मूदत संपल्यावर पोस्टर्स/बॅनर्स काढले जात नाही, त्यामुळे ते काढण्यास महापालिकेस निधी खर्च करावा लागत आहे.

मा.उच्च न्यायालयाने शहरातील अनधिकृत पोस्टर्स/बॅनर्स/होर्डीगवर कार्यवाही करणबाबत वेळोवेळी आदेश पारित केलेले आहेत त्यानुसार कार्यवाही केली जात आहे.

मागील माहे जानेवारी २०१५ पासून ६७९८ अनधिकृत पोस्टर्स/बॅनर्स/होर्डीग हटविण्याची/ काढून टाकण्याची कारवाई करणेत आलेली आहे व महाराष्ट्र प्रिव्हेन्शन ऑफ डिफेसमेंट ऑफ प्रॉपटी ॲक्ट, १९९५ अन्वये वेळोवेळी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

यासंर्व बाबींचा विचार करता, शहरातील अनधिकृत पोस्टर्स/बॅनर्स/होर्डिग लावण्यावर नियंत्रण आणण्यासाठी व महापालिकेकडून मोठया प्रमाणात होणारा खर्च वसूली होणेसाठी ठोस उपाययोजना करणे क्रमप्राप्त झाले आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे अनधिकृत पोस्टर्स/बॅनर्स/होर्डीग हटविण्यासाठी दंडात्मक प्रशासकीय शुल्क वसूल करण्याचे निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | आकार | प्रशासकीय आकार (ना परतावा) | कापडी फलक, पोस्टर्स, बॅनर्स, होर्डींग स्वत: काढण्यासाठी आकारावयाची रक्कम (परतावा) |
|---|---|---|---|
| १. | रु.१००/- प्रती दिन चौ.फुट | रु.५०/-प्रती चौ.फुट कापडी फलक, पोस्टर्स, बॅनर्स, होर्डींगच्या संख्येनुसार | रु.१००/- प्रती चौ.फुट |

१. सदरचे कापडी फलक, पोस्टर्स, बॅनर्स, होर्डींग यांची मुदत तीन दिवसाकरीता असेल.

२. सदरचे कापडी फलक, पोस्टर्स, बॅनर्स, होर्डींग यांना परवानगी देतान परवानगीची तारीख व वेळ नमुद करण्यात यावी.सदर मुदतीनंतर कापडी फलक, पोस्टर्स, बॅनर्स, होर्डींग संबंधित संस्था किंवा व्यक्ती यांनी मुदतीत व वेळेत न काढल्यास परतावा रक्कम जप्त करण्यात येईल.

३. संबंधित संस्था किंवा व्यक्ती यांनी विहित मूदतीत कापडी फलक, पोस्टर्स, बॅनर्स, होर्डींग स्वत:हून न काढल्यास संबंधितांवर महाराष्ट्र प्रिवेंशन ऑफ डिफेसमेंट ऑफ प्रॉपर्टी अॅक्ट, १९९५ चे कलम ५ अन्वये स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात येईल.

४. जी संस्था किंवा व्यक्ती विनापरवाना कापडी फलक, पोस्टर्स, बॅनर्स, होर्डींग लावतील त्यांचेकडुन रु.५००/- प्रति चौ.फु. प्रमाणे दंड वसुल करुन संबंधितांवर महाराष्ट्र प्रिवेंशन ऑफ डिफेसमेंट ऑफ प्रॉपर्टी अॅक्ट, १९९५ चे कलॅम ५ अन्वये स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात येईल.

**(जाहिरात फलक लावणेसाठी सोबतच्या नमुन्यात परवानगी देण्यात यावी)**

Jaiswal 3/10/15

**महापालिका आयुक्त**
**ठाणे महानगरपालिका**

Scanned by CamScanner

दूरध्वनी २५३३ १२११
२५३३ १५९०

# ठाणे महानगरपालिका

महानगरपालिका भवन, डॉ.अल्मेडा रोड, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे ४००६०२
THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

**संदर्भ क्र.** ठ.म.पा./ दिनांक :-

**प्रति.**

.....................................................

.....................................................

.....................................................

**विषय : कापडी फलक** / बॅनर / पोस्टर्स इ. लावणेस परवानगी मिळणेबाबत.

**संदर्भ : १) आपला** दि. .................. रोजीचा आवक अर्ज क्र. .........................

**२) पावती क्र.** .................. दि. ................ रक्कम रु. .................

**( अक्षरी रु.** ....................... ....................... .......................)

**आपले कापडी** फलक / बॅनर / पोस्टर्स इ. लावणेस परवानगी देणेबाबतचे उपरोक्त **विषयांकीत** व संदर्भांकीत अर्ज पाहता आपणांस खालील अटी व शर्थीवर कापडी फलक / बॅनर / **पोस्टर्स** इ. लावणेस फक्त दि. ........................ ते दि. ........................ या कालावधीसाठी **परवानगी** देण्यात येत आहे.

१) मंजूरीपेक्षा जास्त संख्येचे / आकाराचे बॅनर लावता येणार नाही व खाली मंजूर ठिकाणीच व परवानगीनुसार मोजमापाचे कापडी फलक / बॅनर / पोस्टर्स इ. प्रदर्शित करण्यांत यावेत.

२) परवानगीपत्रात नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरिक्त कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी /वाहतूक बेटावर / चौकामध्ये / झाडावर / पदपथावर अथवा रस्त्यावर या ठिकाणी कोणत्याही कारणास्तव कापडी फलक / बॅनर / पोस्टर्स इ. लावता अथवा प्रदर्शित करता येणार नाही. तसे केल्यास परवानगी रद्द समजणेत येईल.

३) मंजूर आकाराचे कापडी फलक / बॅनर / पोस्टर्स इ. वाहतुकीस / रहदारीस अडथळा होणार नाहीत अशा पद्धतीने प्रदर्शित करावे.

४) या परवानगीनुसार लावणेत येणारे कापडी फलक / बॅनर / पोस्टर्स इ. खालच्या भागात परवानगी नंबर, दिनांक व परवानगीचा कालावधी ठळकपणे दिसेल त्याप्रमाणे नमूद केला पाहिजे. जाहितरात कापडी फलक / बॅनर / पोस्टर्स इ. वर वरीलप्रमाणे तपशील नमुद नसेल तर परवानगी रद्द समजण्यात येईल.

५) मुदतीनंतर विनाविलंब वरील कापडी फलक / बॅनर / पोस्टर्स इ. त्वरीत स्वखर्चाने काढून घ्यावेत व तसे न केल्यास महापालिकेकडून कारवाई करणेत येईल व त्यापोटी आपण भरलेली रक्कम जप्त करण्यात येईल व संबधितांविरुध्द गुन्हा दाखल करणेत येईल. तसेच अनामत जप्त करण्यात येईल.

६) समाजात तेढ निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. कोणताही आक्षेपार्ह मजकूर बॅनरवर छापू नये.

७) महाराष्ट्र सार्वजनिक मालमत्ता विरुपन कायदा १९९५ चा भंग होणार नाही तसेच प्रकरणी मा. न्यायालयाचे आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

वरील अटी - शर्तीवर खालील ठिकाणी बॅनर लावणेस परवानगी देणेत येत आहे.

| **अ.क्र.** | **ठिकाण** | **मोजमाप** | **फलकांची संख्या** |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ५ | | | |

वरील अटी - शर्तीचा भंग केल्यास सदरची परवानगी रद्द समजणेत येईल व आपणासह सर्व संबंधितांविरुध्द कारवाईसाठी महाराष्ट्र सार्वजनिक मालमत्ता विरुपन कायदा १९९५ अंतर्गत स्थानिक पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात येईल, याची नोद घ्यावी.

सहा.आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी
........................ प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे

वरील अटी व शर्ती मला/आम्हाला मान्य असून त्यांचा भंग झाल्यास मी/आम्ही सर्व संबधित कायदेशीर कारवाईस पात्र राहिल/राहू.

**परवानगी घेणाऱ्याची स्वाक्षरी**

नांव :
दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक :